Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI | ISSUE- II | FEBRUARY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# सविनय कायदे भंग चळवळीत स्त्रियांचे योगदान

**प्रा. डॉ. बाबुसिंग जोतिराम राठोड**
सहा. प्राध्यापक
(इतिहास विभाग)
मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय,
सालेकसा ता. सालेकसा जि. गोंदिया

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही जगाच्या इतिहासातील सर्वात मोठी स्वांतत्र चळवळ होती. हा केवळ स्वातंत्र लढयाचा भाग नसून तर त्याचे मुळ सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक संघर्षात ही रूजलेले होते. भारतीय स्त्रिया हया प्राचिन काळापासूनच पुरूषाच्या बरोबरीने खांदयाला खांदा लावून प्रत्येक कौटंबिक, धार्मिक व राजकिय कार्यामध्ये सहकार्य करित होत्या त्याचीच पुर्नवृत्ती भारतीय सविनय कायदे भंग चळवळीत उभे झाले स्त्रियांच्या या संक्षमीकरणामध्ये वृध्दि सुध्दा झाली शिवाय महात्मा गांधीजीच्या आगमनाने स्त्रियांच्या धैर्यामध्ये वाढ झाली तसेच चळवळीला अधिक वेग आल्याचे दिसून येते. भारताच्या स्वातंत्र लढयात बहुतांश शिक्षित आणि शहरी पार्श्वभूमि असलेले स्त्रिया चळवळीत अधिक होत्या ज्यांनी सामाजिक बांधीलकीचे कडे तोडुन भारताच्या स्वांतत्र चळवळीत सहभाग नोंदवला यांच्या कार्याचा परिघ अधिक व्यापक दिसून येतो. स्त्रियांचा भारतीय स्वातंत्र चळवळीत निश्वार्थ कार्याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. ब्रिटीश सत्तेशी भारतीय जनतेने सामर्थ्यवान व शस्त्रसज्ज असलेल्या ब्रिटीश सत्तेला भारत सोडण्यास भाग पाडले. संपुर्ण भारत ही जणू युद्धभूमी बनली होती, आणि प्रत्येक नागरिक, स्त्री—पुरूष, आवालवृद्ध स्वातंत्र्याचा पाईक बनला होता, शतकानुशतकाच्या सामाजिक बंधनाच्या बेडया भारतीय स्त्रीने आणि स्वातंत्र्य समरात उडी घेऊन स्वातंत्र्य लढा सतत तेवत ठेवण्याचे कार्य केले. असहकार आणि अहिंसेच्या शस्त्रानी लढल्या गेलेल्या स्वातंत्र्य लढयात तिने पुरूषांच्या बरोबरीने भाग घेऊन लढा यशस्वी केला. या स्त्रीयांनी ज्या हालअपेष्टा आनंदाने सहन केल्या आणि जो त्याग सहजपणे करून दाखविला, त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीला उदात्तता प्राप्त झाली.

**भारताच्या स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांच्या कार्य**

''१० एप्रिल १९३० ला गांधीनी 'यंग इंडिया' मधून स्त्रियांना सूत कातणयाच्या आणि दारू दुकानांवर व परदेशी कापडाच्या दुकानांवर निषेध करण्याच्या कामात सहभागी होण्याचे खास आवाहन केले. या आवाहनाचा जणू जादूसारखा परिणाम झाला. हजारो भारतीय स्त्रियांनी गांधींच्या हाकेला साथ दिली. जुन्या वळणाच्या आणि प्रतिष्ठित कुटुंबातील ज्या स्त्रियांनी कधी घराचा उंबरठाही सहसा ओलांडला नव्हता, त्या स्त्रीया धडाडीने कायदेभंगाच्या चळवळीत सामील झाल्या आणि न डगमगाता तुरूंगात ही गेल्या. त्यांच्या धीरोदात्त कृतीमुळे सरकार तर चकीत झालेच; परंतु भारतीय समाजातील पुरूषांनाही आश्चर्याचा धक्का बसला.'' भारतीय स्त्रियांच्या जीवनातील हे अकस्मात घडलेली परिवर्तन पाहून एच.एन. ब्रेल्सफोर्ड व स्लोकोंबी हे पाश्चात्य प्रवासी कमालीचे प्रभावीत झाले. ''गांधींच्या कायदेभंग

चळवळीने अन्य काही साध्य न करता केवळ भारतीय स्त्रीची मुक्तता करण्याचे कार्य केले असते; तरी देखील ही चळवळ पुर्णतया यशस्वी झाली. असे मानावे लागले असते'' असे उद्गार काढले. वरील विधान कायदेभंग चळवळीविषयी असले तरी एकूणच स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांना लागू होणारे आहे.

'भारतीय स्वातंत्र्या लढयातील स्त्रियांचे योगदान' या शोधनिबंधात राष्ट्रीय कॉग्रेसचे 'छोड़ो भारत' आंदोलनाच्या काळात स्त्रियांनी कोणते आणि कसे योगदान दिले याचा आढावा आपण घेणार आहे.

## गांधीपुर्व काळ:

सविनय कायदेभंग चळवळीनंतर स्वातंत्र्यलढयात भरतीय स्त्रिया मोठया संख्येने सामील झालेल्या दिसतात. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, १९३० नंतर स्त्रिया चळवळीत उतरल्या भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या स्थापनेपासूनच राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग होता असे म्हणता येईल. सन २८ डिसेंबर १८८५ ला मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय कॉग्रेसच्या अधीवेशनात मॅडम २ भिकाजी रूस्तम कामा या उपस्थित होत्या. सर चार्ल्स ब्रॅडलॉ यांच्या प्रयत्नाने राष्ट्रीय कॉग्रेसच्या चवथ्या अधीवेशनात पंडिता रमाबाईच्या नेतृत्वाखाली

कॉग्रेसमध्ये स्त्रियांनी हजर रहाण्याविषयी लिहिले, आणि मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय कॉग्रेसमध्ये पं. रमाबाई कु. एस. माणेकजी, कुर्सेटजी. डॉ.सौ.एमा. रडेर, सौ. शेवंतीबाई त्र्यंबक, कॅनरन, सौ. काशीबाई कानिटकर, स्वर्णकुमारी देवी, डॉ. कु.जेसी कार्टेलन, कु. गांगुजी उर्फ कदंबिनी बोस अश्या अनेक स्त्रिया अधीवेशनात सहभागी होत्या. भारतीय राष्ट्रीय चळवळीतील स्त्रियांच्या सहभागीची खऱ्या अर्थाने सुरूवात म्हणता येईल.

दिवसेंदिवस कॉग्रेसचे स्वरूप केवळ काही मुठभर सुशिक्षितांचा मेळावा असे मर्यादित न राहता आता ती एक मजबुत राजकीय संघटना बनत चालली होती आणि या संघ टनेने लोकांच्या हक्कासाठी राजकीय चळवळ आणि संघर्ष करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली होती हे धूर्त ब्रिटीश सरकारच्या लक्षात येऊ लागली होती आणि ही चळवळ दुभंगली जावी यासाठी ब्रिटीश साम्राज्यवाद्यानी 'फोडा आणि झोडा' या कुटिल राजनीचा अवलंब करण्यास सुरवात केली. याचाच एक भाग म्हणून सन १९०५ मध्ये व्हाइसरॉय लार्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. कर्झनचा हा डाव बंगालच्या विचारी लोकांच्या तात्काळ लक्षात आला. म्हणूनच बंगाली जनतेने फाळणीला सर्व शक्तीनिशी विरोध केला. फाळणीमुळे बंगाल पूर्वीपेक्षा एक संघ झाला आणि बंगालचा प्रश्न बंगालपुरता मर्यादित न राहता तो संपुर्ण देशाचा प्रश्न बनला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतरायांसारखा भारतीय नेत्यांनी बंगाली जनतेला पाठिंबा देऊन ''बंगालची फाळणी हे कर्झनने भारताला दिलेले आव्हान केले.'' असे जाहिर केले. लोकांच्या विरोधाच्या योग्य आविष्कार व जन आंदोलनाचे प्रभावी साधन म्हणून 'स्वदेशी' आणि 'बहिष्कार' या दोन मार्गांनी विरोध करण्याचे ठरविले. भारतातील सर्व प्रांतातील जनतेने बंगाली जनतेवर झालेल्या अन्यायाविरूद्धच्या लढयात शामील होऊन स्वदेशी आणि बहिष्कार या शस्त्रांच्या सहाय्याने लढावे असे आवाहन लो.टिळकांनी केले. आणि या आवाहनाला संपूर्ण भारतातून प्रतिसाद मिळाला. भारतीय स्त्रियांनीही आपली जवाबदारी ओळखली. 'स्वदेशी आणि बहिष्कार' चळवळीत बंगाल पंजाब महाराष्ट्र या प्रांतातील महिलांनी विशेष कामगिरी केली.

बंगालमध्ये स्वदेशीचा संदेश महिलापर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य स्वर्णकुमारी देवी, त्यांच्या कन्या सरलादेवी चौधुराणी, कुमुदिनी मित्तर इ. स्त्रियांनी केले. या महिनलांनी विविध ठिकाणी परदेशी मालाचा बहीष्कार व स्वदेशी मालाचा प्रचार

आणि चरख्याचे महत्तव पटविण्यासाठी अनेक सभा आयोजित केल्या. सरलादेवी चौधुराणी यांनी १८९७ मध्ये 'भारती' या बंगाली मासिकाच्या संपादनाची जवाबदारी घेतली. दोन वर्षी त्यांनी या मासिकाद्वारे हिंदु—मुस्लीम ऐक्याचा प्रचार केला. भारताच्या विविध प्रांतातील लोकांनी एक होऊन स्वातंत्र्य लढयाला तोंड द्यावे असे आवाहन करणारी एक कविता सरलादेवीनी रचिली होती. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ७व्या अधीवेशनात ती कविता सामुदायिकरित्या गाण्यात ३ आली. भारतीयांमध्ये ऐक्याची भावना निर्माण करण्याबरोबर सरलादेवीनी'लक्ष्मी भांडार' हे स्वदेशी दुकान चालवून स्वदेशी मालाचा प्रचार करण्याचे कार्य केले. १९०४ मध्ये त्यांना तलम वस्त्राच्या निर्मितीसाठी सुवर्णपदक मिळाले.

मेमनसिंग जिल्हायात निर्माण झालेल्या 'सुन्हद समिती' या क्रांतीकारी घटनेशी सरलादेवींचा जवळचा संबंध होता. विवाह झाल्यावर लाहोरहून त्या समितीला मार्गदर्शन करत.

सरलादेवीप्रमाणे कुमुदनी मित्तर ही या काळातील एक सक्रीय कार्यकर्ती होय. तिने बंगालमधील सुशिक्षित ब्राम्हण स्त्रियांची संघटना करून पोलिसांची नजर असणाऱ्या अनेक नेत्यांशी वेळोवेळी संपर्क साधण्याचे कार्य केले.

बंगालप्रमाणे पंजाब मध्येही महिलांनी चळवळीत भाग घेतला. स्वातंत्र्यांची ज्योत तेवत ठेवण्याची आर्य समाजाच्या महिला प्रामुख्याने कार्यरत होत्या. पुरनीदेवी, हरीदेवी यानी अल्लेखनीय कार्य केले. हरीदेवी

सत्याग्रहाने सत्याग्रहतंत्राचा उपयोग करून ब्रिटीश साम्राज्यशाहीला नमविण्यात किती प्रभावी ठरू शकते यांच प्रत्यंतर आले. दुसरे म्हणजे या चळवळीत सामील झालेल्या जयाबाई भोई, सरस्वताबाई भुस्कुटे, अन्नपुर्णा घारे, पार्वतीबाई परचुरे इ.स्त्रियांनी पोलिसांचा अत्याचाराला तोंड देऊन सत्याग्रह यशस्वी केला. स्त्रीच्या अंगी असणारी चिकाटी आणि धाडस याचे प्रत्यंतर आले. सर्वसामान्य महिला मुळशी सत्याग्रहात प्रथम उतरल्या.

९२८ च्या बार्डोली सत्याग्रहात प्रारंभी स्त्रियांची अनुपस्थिती असली तरी एप्रिलनंतर स्त्रिया मोठया संख्येने सामील झालेल्या दिसतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या स्वतंत्र सभा झाल्या होत्या. स्त्रियांच्या पाठिंब्यामुळे तिकडे सरकारने जमीन व इतर संपत्ती जप्त करण्यास सुरूवात केली. तरी लोकांनी कर न देण्याचा निर्धार कायम ठेवला. ज्या जमिनी विकण्याचे सरकारने घोषित केले होते त्या जमिनीवर मणिबेन पटेल, मिथुबेन पेटीट, भक्तीबेन देसाई या महिलांनी तंबू ठोकून सत्याग्रह केला. मुळशी सत्याग्रह, बोरसद सत्याग्रह याप्रमाणे बार्डोली सत्याग्रहात ग्रामीन, शेतकरी, कामकरी महिला सामील झाल्या.

**सायमन कमिशनला स्त्रियांचा विरोध :—**

'सायमन कमिशन'च्या भारत भेटीच्या वेळी भारतभर जी निदर्शने करण्यात आली त्या निदर्शनात स्त्रियांनी भाग घेतना. मुंबईत ३ फेब्रुवारी १९२८ ला कड़क हरताळ पाळण्यात आला. हरताळाबाबत मुंबई प्रदेश कॉंग्रेस सभा घेतल्या.यामध्ये मथुराबाई मेटकर, सरोजिनीदेवी नायडू, रतनबाई मेहता यांनी स्त्रियांना हरताळात सामील होण्यासाठी आवाहन करण्यात पुढाकार घेतना. मुंबईतील कॉलेज युवतीनी पत्रक काढून कॉलेज तरूणांनी बहिष्कारात सामील व्हावे असे आवाहन केले. या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आणि सायमन कमिशनचे काळया झेडयांनी स्वागत केले. दुपारी जहांगीर हॉलमध्ये विद्यार्थ्यांची सभा घेण्यात आली. सभेस २ हजार लोक उपस्थित होते. युसूफ मेहर अली, नरीमन यांच्याबरोबर सरोजिनी नायडू प्रेमा कंटक आणि कु. भसीन यानी अपारभर भाषणे केली.

**सविनय कायदेभंग चळवळ आणि कर्तबगार स्त्रिया**

१९२८ मध्ये कलकत्ता इथे झालेले कॉंग्रेसचे अधिवेशन महत्वपुर्ण होते. या

अधिवेशनात १९ मूलभूत हक्कांसह वसाहतीच्या वहातीच्या स्वाराज्याची मांगणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावात असेही म्हणण्यात आले की, ‘‘वर्षभरात ब्रिटीश सरकारन मागणी मान्य केली नाही तर कॉग्रेस पुन्हा असहकार चळवळ सुरू करेल.’ पण याचा सरकारवर काहीच परिणाम झाला नाही. हे पासून १९२९ च्या लाहोर कॉग्रेसमध्ये संपूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर आणि २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्यदिन म्हणून देशभर पाळण्याचे ठरविण्यात आले. या आवाहनानुसार देशभर स्वातंत्र्यदिनस्वातंत्र्यदिन पाळण्यात आला.अशा रीतीने स्वातंत्र्यदिन साजरा करणे ही आगामी संग्रामाची नांदीच होती. सरकारने कॉग्रेसच्या मागणीचा विचार केला नाही आणि गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळीचे देशाला आवाहन केले. ६ एप्रिल १९३० ला मिठाच्याा सत्याग्रहाने सुरूवात झाली. या आंदोलनात महिला पुरूषांच्या बरोबरीने सामील झाल्या, आणि चळवळीच्या सुरूवातीला म. गांधीनी स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांच्या कार्याविषयी दाखविलेला विश्वास सार्थ करून दाखविला असहकार चळवळीसाठी स्त्रियांना प्रेरित करतांना म. गांधी म्हणाले, ‘‘स्त्रियां या लढयातील आपला भार पूर्णत: उचलू शकतील. सरकारला आपल्या प्रत्येक सैनिकाला अटक करू द्या. मला काळजी वाटत नाही. आपले काम इतके सोपे आहे की, आपल्या महिला ते सहजासहजी करू शकतील.

सत्याग्रहात धारासाणच्या मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनीदेवी नायडू यांनी केले. मुंबईच्या सत्याग्रहात कमनादेवी चट्टोपाध्याय आणि अवंतीकाबाई गोखले अग्रेसर होत्या. ७ एप्रिल १९३०ला २०हजार स्त्री—पुरूषांनी समुद्रावर जाऊन मीठ बनविले. हे मीठ कॉग्रेस भवनात विक्रीसाठी ठेवले. मिठाची विक्री सुरू होती. लोकांचा सत्याग्रहाला वाढता प्रतिसाद पाहून पोलिसांनी १० एप्रिलला कॉग्रेस भवनावर धाड घातली. कमलादेवी शंकरलाल बॅकर, क्रॉनिकलचे संपादक हार्निमन यांच्याबरोबर सरोजिनीदेवी नायडू, आणि अनुसुया बेन या महिलांचा समावेश होता. रौलेट कायद्याविरूद्ध देशभर हडताळ पाळण्याचे ठरविण्यात आले. ३० मार्च १९३० हा दिवश निश्चित करण्यात आला. या दिवशी हिंदुस्थानातील सर्व स्त्री—पुरूषांनी उपास करावा. समुद्रावर, नदीवर, तळयावर किंवा सार्वजनिक विहिरीवर स्नान करावे असे गांधीनी जाहीर केले. हडताळ, उपवास, स्नान या तीन गोष्टी सर्वांना सहज करता येण्यासारख्या होत्या. एवढेच नव्हे तर आजपर्यंत झाली नाही आणि यापुढेही अशी जागृती होणार नाही. नंतर ३० मार्च ऐवजी ६ एप्रिल हा हरताळाचा दिवस ठरविण्यात आला. मुंबईत ६ एप्रिल १९३० हा हडताळाचा दिवस ठरविण्यात आला.

मुंबईत ६ एप्रिल १९३० ला चौपाटीवर दीड लाख लोकांचा समुदाय जमला होता. यात मोठया संख्येने स्त्रियाही सामील झाल्या. सरोजिनीदेवी नायडू, अवंतीकाबाई गोखले यांनी स्त्रियांनी हरताळामध्ये सामील व्हावे म्हणून अनेक सभा घेतल्या होत्या. स्वातंत्र्य चळवळीत प्रथमच एवढया मोठया प्रमाणात स्त्रिया सामील झाल्या. होत्या.

**सविनय कायदेभंग चळवळीत स्त्रियांच्या कार्याचे मुल्यमापन :—**

अश्याप्रकारे प्राचिन काळापासून चुल आणि मुल व पुरूष प्रधान संस्कृतित वावरलेल्या भारतीय स्त्रिया सविनय कायदेभंग चळवळीत आपले हक्क लक्षात घेवून या आंदोलनात मोलाचे योगदान दिले हे आपण वरिल त्यांच्या कार्यावरून पाहु शकतो भारतीय स्त्रियांनी आपले सर्वस्व अर्पण केले मग त्यामध्ये आर्थिक योगदानामध्ये आपले अमुल्य श्रृंगारातील दागीने सुध्दा देशाला अर्पण केले. स्त्रिया प्रत्येक्ष आंदोलनामध्ये भाग घेवून शारीरिक आणि बौध्दिक योगदान दिले हे कदापी नाकारता येत नाही.

**संदर्भ:**

1. १.प्रधान ग.प्र. —स्वातंत्र्याचे महाभारत, साधना प्रेम आणि साधना प्रकाशन, पुणे १९८९.पा.२६३—६४.
2. २.जोशी व्ही. एस. अग्निपथावरील परागंदा, मनोरमा प्रकाशन मुंबई १९८७, पा, ११९.
3. 3- Zaidi,Amain & Zaidi Zahida- The Encyclopida of Indian National Congress, Schandi & Co. New Delhi,1976 p.p.103-106.
4. 4- Kaur Manmohan – Rol of Women in th Freedom Movement of India (1857-1947)
5. 5- Home Political –Confidential 25 May 1908 .
6. गोखले दा.ना-कर्मवीर बाबाराव सावरकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७९ पा. ६८.
7. Modern Review, Angans 1910, p.124.
8. आपटे पा.श्री. - गांधीदर्शन, अ.वि. गृह प्रकाशन, पुणे १९४८, पा. ९५
9. Nanda B.R. (ed) – Indian Women, vikas Publishing House Delhi, 1976 p.p.
10. भुस्कुटे विनायकराव-मुळशी सत्याग्रह, दास्ताने आणि कं. पुणे, १९६८ पा. १७२-२४९.
11. Nanda B.R.-Op. Lit.P.
12. Home Department File No. (147) (K)-pt.119 &IV (a)